**MHAH240006442013**

**दाखल तारीख** : १८.०४.२०१३

**नोंदणी तारीख** : १८.०४.२०१३

**निकाल तारीख** : १०.०८.२०२६

**कालावधी** : १३व. ०३म. २३दि.

**भाग अ**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोर्ट क्र. ०२, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात**

**(पीठासीन अधिकारी – रविंद्र भगवान खवले)**

दि.१०.०८.२०२६

**नियमीत फौजदारी खटला क्रमांक – ८५/२०१३** **निशाणी क्रमांक – ६४**

**MHAH240006442013**

बेलवंडी पोलीस स्टेशन गु.र.नं. ०५/२०१३

| | |
|---|---|
| अभियोग पक्ष | **महाराष्ट्र शासन**<br>मार्फत – पोलीस ठाणे बेलवंडी,<br>ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर. |
| अभियोग पक्षातर्फे विधीज्ञ | श्री. टी. वाय. ठाकुर. |
| | **विरूध्द** |
| आरोपी | **१. विनायक छगन सकट,**<br>वय वर्षेः ३०, धंदाः<br>**२. छगन तुकाराम सकट,**<br>वय वर्षेः ६२, धंदाः<br>**४. पुष्पाबाई छगन सकट,**<br>वय वर्षेः २५, धंदाः |

| | |
|---|---|
| | **५. ललिता छगन सकट,**<br>वय वर्षे: २४, धंदा:<br>सर्व रा. विसापुर,<br>ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर. |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | श्री. डब्ल्यू. एम. इनामदार. |

## भाग ब

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | २६.०२.२०१२ पासुन दोन महिन्यानंतर ते पुढील चार महिन्यांपर्यंत |
| गुन्हा दाखल दिनांक | १८.०१.२०१३ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | १८.०४.२०१३ |
| दोषारोप तयार केल्याचा दिनांक | २५.०२.२०१४ |
| पुरावा सुरु केल्याचा दिनांक | ०४.०४.२०२६ |
| न्यायनिर्णयास ठेवल्याचा दिनांक | ०८.०८.२०२६ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | १०.०८.२०२६ |
| दोषी ठरल्याचा दिनांक, जर असल्यास | — |

## आरोपींची सविस्तर माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक केल्याचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा | दोषारोप कलम | निर्दोष अथवा दोषी | शिक्षा दिली असल्यास किती | न्यायालयीन बंदी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | दिनांक | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | विनायक छगन सकट | ०७.०३. २०१३ | अटकपुर्व जामीन | ४९८अ, ३२३, ५०४, ५०६, ३४ | निर्दोष | — | — |
| २ | छगन तुकाराम सकट | --//-- | --//-- | ४९८अ, ३२३, ५०४, ५०६, ३४ | निर्दोष | — | — |
| ४ | पुष्पाबाई छगन सकट | --//-- | --//-- | --//-- | निर्दोष | - | - |
| ५ | ललिता छगन सकट | --//-- | --//-- | --//-- | निर्दोष | - | - |

## भाग क

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार/आरोपीतर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार यांची यादी

### अ. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| १ | बजरंग खंडेराव गवळी | तपासी अंमलदार |

ब. आरोपीतर्फे साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

क. न्यायालयीन साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

## अभियोग पक्ष/आरोपी/न्यायालयीन पुराव्यांची यादी

अ. अभियोग पक्षाचा पुरावा

| निशाणी क्र. | कागदपत्राचे वर्णन |
|---|---|
| | निरंक |

ब. आरोपीतर्फे पुरावा

| निशाणी क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

क. न्यायालयीन पुरावा

| निशाणी क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

ड. मुद्देमाल

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | निरंक | |

## न्यायनिर्णय

(जाहीर दिनांक १० ऑगस्ट, २०२६)

सदरचा खटल्यामध्ये प्रस्तुत आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम ४९८अ, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ प्रमाणे संपरिक्षा झालेली आहे.

**अभियोग पक्षाचे कथन संक्षिप्त स्वरुपात खालीलप्रमाणे :-**

२. यातील फिर्यादी यांनी दि. १८.०१.२०१३ रोजी फिर्याद दिली की, ते सध्या माहेरी आई-वडीलांकडे रहात आहे. त्यांचे लग्न दि. २६.०२.२०१२ रोजी विसापुर, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर येथील राहणारे विनायक छगन सकट यांचेबरोबर झाले असुन लग्न हे त्यांचे माहेरी अमदाबाद येथील घरासमोर झालेले आहे. लग्नामध्ये त्यांचे आई-वडीलांनी सर्व मानपान देवुन थाटामाटात करुन दिले आहे. त्यांचे वडील विष्णु लहू साळवे हे मोलमजूरी करतात. सासर घरी त्यांना त्यांचा नवरा विनायक छगन सकट, सासरे छगन सकट, सासु बायसाबाई छगन सकट, नणंद पुष्पा छगन सकट, ललिता छगन सकट असे नातेवाईक सर्व एकत्र विसापुर येथे राहतात.

३. त्यांचे लग्न झालेनंतर ते सासरी विसापुर येथे नांदत असताना त्यांना लग्नानंतर दोन महिने सासरचे लोकांनी चांगले नांदविले. त्यानंतर त्यांचा नवरा विनायक छगन सकट, सासु बायसाबाई छगन सकट, सासरे छगन सकट, नणंद पुष्पा छगन सकट, ललिता छगन सकट हे त्यांना म्हणु लागले की, "तुझ्या आई-वडीलांकडुन घर बांधणेसाठी ५०,०००/- रुपये घेऊन ये" असे म्हणु लागले. म्हणुन ते सासरी आई-वडीलांकडे पैशांसाठी गेले होते. त्यावेळी त्यांनी आई-वडीलांना त्यांचे सासरचे लोक घर बांधणेसाठी ५०,०००/- रुपये घेऊन ये असे सांगितल्याने त्या माहेरी आले आहे असे वडीलांना सांगितले, परंतू त्यांच्या आई-वडीलांची परिस्थीती गरीबीची असल्याने ते पैसे देवु शकले नाहीत. म्हणुन त्यांनी पुन्हा सासरी येऊन सासरचे लोकांना सांगितले की, सध्या त्यांचेकडे पैसे नाहीत. वडीलांची परिस्थीती गरीबीची आहे. पैसे आलेनंतर

तुम्हाला पैसे देऊ असे म्हणाले परंतू त्यांनी त्यांचे काहीएक ऐकुण घेतले नाही. तेव्हा पासुन त्यांना त्यांचे सासरचे लोक त्रास देऊ लागले, नेहमी शिवीगाळ, दमदाटी करु लागले. सासु, नणंदा नेहमी टोचुन बोलु लागले. त्यानंतर नव–यानी त्यांना वरील पैशांसाठी मारहाण केली व शिवीगाळ केली व नांदवणार नाही असे म्हणुन माहेरी हाकलुन दिले. अशा आशयाची फिर्याद नोंदवली.

४. सदर तक्रारीवरुन बेलवंडी पोलीस ठाणे येथे भारतीय दंड विधान कलम ४९८अ, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये आरोपींविरुध्द गुन्हा रजिस्टर नं.०५/२०१३ दाखल झाला. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस हवलदार श्री. बजरंग खंडेराव गवळी यांनी केला. तपासादरम्यान साक्षीदारांचे जबाब घेतले व त्यानंतर आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

५. दोषारोपातील मजकुर व दाखल कागदपत्र पाहून माझे पुर्व पिठासिन अधिकारी यांनी आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम ४९८अ, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये नि.२८ वर दोषारोप ठेवला. सदर दोषारोप आरोपीस त्याच्या भाषेमध्ये वाचून दाखवला असता त्याने तो नाकबूल केला. त्यानंतर संपरिक्षेदरम्यान अभियोग पक्षातर्फे साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात आली. त्यामुळे, अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. अभियोग पक्षाने तपासलेले साक्षीदार तपासी अंमलदार यांच्या साक्षीजबाबामध्ये आरोपीने गुन्हा केल्याबाबत सबळ असा पुरावा आलेला नाही. त्यामुळे आरोपींचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वये जबाब नोंदवण्यात आला नाही.

६. अभियोग पक्षातर्फे विधीज्ञ श्री. टी. वाय. ठाकुर व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. डब्ल्यु. एम. इनामदार यांचा युक्तिवाद ऐकला. त्यानंतर अभिलेखाचे अवलोकन केले. त्यानुसार खालील मुद्दे माझे निष्कर्षाकामी निर्माण झाले. सदरचे मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अभियोग पक्ष हे शाबित करतो काय की, दि. २६.०२.२०१२ ते सप्टेंबर २०१२ रोजी पर्यंत मौजे विसापुर, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर गावचे हद्दीत आरोपीचे राहते घरी आरोपींनी आपआपसात संगनमत करुन तक्रारदार मनिषा विनायक सकट यांना घर बांधण्यासाठी वडीलांकडुन ५०,०००/– रुपये घेऊन ये म्हणुन आरोपींनी मारहाण, शिवीगाळ केली व शारिरीक, मानसिक जाचहाट व छळ केला ? | ..नाही.. |
| २) | अभियोग पक्ष हे शाबित करतो का की, वर नमूद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपी यांनी आपआपसात संगनमत करुन तक्रारदार यांना हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन त्यांना दुखापत पोचवली ? | ..नाही.. |
| ३) | अभियोग पक्ष हे शाबित करतो का की, वर नमूद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपी आपआपसात संगनमत करुन तक्रारदार यांना शिवीगाळ करुन त्यांचा उद्देशपूर्वक अपमान करून त्यायोगे त्यांना प्रक्षोभित केले आणि अशा प्रक्षोभनामुळे त्यांचेकडून सार्वजनिक शांततेचा भंग होईल याची आरोपींना जाणिव होती ? | ..नाही.. |
| ४) | अभियोग पक्ष हे शाबित करतो का की, वर नमूद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपी यांनी आपआपसात संगनमत करुन तक्रारदार यांना जिवे मारण्याची धमकी देवून फौजदारीपात्र धाकदपडशा दाखवला ? | ..नाही.. |

| | | |
|---|---|---|
| ५) | काय आदेश ? | **आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ४ करीता :–**

७. मुद्दा क्र.१ ते ४ हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे पुराव्यांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी एकत्रित चर्चिले आहेत.

८. आरोपी विरुध्दचा गुन्हा सिध्द होण्यासाठी संपरिक्षेदरम्यान अभियोग पक्षातर्फे साक्षीदार श्री. बजरंग खंडेराव गवळी यांची साक्ष निशाणी क्र. ६१ अन्वये नोंदवण्यात आलेली आहे. सदर साक्षीदार हे तपास अधिकारी आहेत. सदर साक्षीदार यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये सदर गुन्ह्याचा तपास त्यांच्याकडे आला होता व आरोपींनी ५०,०००/– रुपये घर बांधण्यासाठी घेऊन येण्याच्या कारणावरुन फिर्यादीचा छळ केला होता असे तपासात निष्पन्न झाल्यातमुळे कोर्टात दोषारोप पत्र दाखल केल्याचे नमूद केले आहे. सदर तपास अधिकारी यांनी त्यांच्या उलटतपासात नमूद केले आहे की, त्यांनी स्वतंत्र साक्षीदार तपासलेले नाहीत.

९. अभियोग पक्षातर्फे एकमेव साक्षीदार तपास अधिकारी यांची साक्ष झालेली आहे. इतर साक्षीदारांना वारंवार साक्षी समन्स काढुन देखील अभियोग पक्ष सदर साक्षीदार यांना खटल्यास सामील ठेवण्यास असमर्थ ठरेलेला आहे. तपास अधिकारी यांनी या न्यायालयास ते साक्षीदार हजर ठेवतील असे देखील सांगितलेले नाही व फक्त स्वतःची साक्ष नोंदवलेली आहे. खटल्यातील फिर्याद सिध्द झालेली नाही. फक्त तपास अधिकारी यांच्या पुराव्यावरुन आरोपींनी दोषारोप ठेवलेला गुन्हा केला ही बाब स्पष्ट होत नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ ते ४ चे उत्तर नकारार्थी देत आहे व मुद्दा क्र. ५ च्या

उत्तराकरीता खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र. १. विनायक छगन सकट, २. छगन तुकाराम सकट, ४. पुष्पाबाई छगन सकट, ५. ललिता छगन सकट यांची भारतीय दंड विधान कलम ४९८अ, ३२३, ५०४, ५०६, ३४ या गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८ (१) प्रमाणे निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येतात.

३. आरोपी यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७ अ नुसार वरिष्ठ न्यायालयात अपीलाचे कामी उपस्थित राहणेची नोटीस आल्यास हजर राहणेबाबत या न्यायालयात प्रत्येकी रु.१५०००/- चे वैयक्तिक बंधपत्र व जामीनकदबा सादर करावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित)

RAVINDRA BHAGVAN KHAWALE
Digitally signed by RAVINDRA BHAGVAN KHAWALE
Date: 2026.08.10 18:26:27 +0500

दिनांक – १०.०८.२०२६
ठिकाण – श्रीगोंदा

रविंद्र भ. खवले,
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
कोर्ट क्र. ०२, श्रीगोंदा

**–: प्र मा ण प त्र :–**

प्रमाणीत करण्यात येते की, या पी. डी. एफ. फाईलमधील प्रत्येक शब्द हा मुळ आदेशाच्या प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | : | पी. डी. पाटील (श्रेणी–३) |
| न्यायालयाचे नांव | : | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोर्ट क्र. ०२, श्रीगोंदा, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर. |
| न्यायनिर्णय घोषित केल्याचा दिनांक | : | १०–०८–२०२६ |
| पिठासीन अधिकारी यांनी सही केल्याचा दिनांक | : | १०–०८–२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड दिनांक | : | १०–०८–२०२६ |